ग्रामपंचायत वाकसई (केळवेरोड), ता. पालघर, जि. पालघर यांना रस्ता बांधण्यासाठी, गट क्र. ४६७ मधील ४०० मी. लांब व १५ मी. रूंद जागा कायमस्वरूपी हस्तांतरीत करण्याकरिता सदर जागा महसूल व वन विभागास प्रत्यार्पित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः पसंपा-२०१७/प्र.क्र.१२१/पदुम-१०

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: २८ मार्च, २०१८

वाचा :-

१) शासन पत्र क्र. पसंपा-२०१३/प्र.क्र. १३२/ पदुम-१०, दि. १४/१०/२०१३
२) आयुक्त दुग्धव्यवसाय विकास विभाग यांचे दि. २८/०२/२०१८ रोजीचे पत्र

प्रस्तावना :-

ग्रामपंचायत वाकसई मधील बोडणपाडा येथील स्थानिक लोकांच्या सोयीकरीता ४००मी. लांब व ९ मी. रूंद रस्ता तयार करण्यासाठी दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या मालकीची जागा वापरण्यास शासन पत्र दि. १४/१०/२०१३ अन्वये ना हरकत दाखला देण्यात आला होता.

उपरोक्त ४०० मी. लांब व ९ मी. रूंद असलेल्या व सध्या रहदारीत असलेल्या रस्त्याची दोन्ही बाजूकडील रूंदी प्रत्येकी ३ मीटरने वाढवून एकूण ४०० मी. लांब व १५ मी. रूंद एवढ्या रस्त्याची मागणी ग्राम पंचायत वाकसई यांनी शासनाकडे केलेली आहे. त्यासाठीचे रेडी रेकनर प्रमाणे परिगणित होणारे मूल्य भरण्यास ग्रामपंचायत वाकसई तयार असल्याचे शासनास कळविण्यात आले आहे.

ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन दि. १/०८/२०१४ रोजी पालघर या नवीन जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. संबंधित क्षेत्रात नगर विकास विभागामार्फ़त प्रादेशिक योजनेच्या स्वरूपास अंतिम रूप देण्यात येत असून, त्यामध्ये केळवे ग्रोथ सेंटरचा समावेश आहे. सदर जागेत सध्या विकास कामे सुरू असून भविष्यातदेखील मोठ्या प्रमाणात विकास कामे होणार आहेत. त्यामुळे येथील रहदारीच्या सोयीसुविधा मोठ्या प्रमाणात वाढणार असून सद्यस्थितीत वाकसई ग्रामपंचायतीस वापरावयास दिलेला रस्ता अपुरा पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब विचारात घेता व तेथील स्थानिक लोकांच्या भविष्यकालीन हितासाठी ग्रामपंचायत वाकसई यांना सदर रस्त्याकरीता वाढीव जागा देऊन उक्त मागणी केलेली जागा हस्तांतरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

ग्रामपंचायत वाकसई, ता. पालघर, जि. पालघर मधील बोडणपाडा येथील स्थानिक लोकांच्या सोयीकरीता ४००मी. लांब व ९ मी. रूंद रस्ता तयार करण्यासाठी दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या

मालकीची जागा वापरण्यास शासन पत्र दि. १४/१०/२०१३ अन्वये यापूर्वी देण्यात आलेला ना हरकत दाखला याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

ग्रामपंचायत वाकसई येथील गट क्र. ४६७ मधील दुग्ध व्यवसाय विकास विभागाच्या मालकीची ४०० मी. लांब व १५ मी. रूंद अशी एकूण क्षेत्रफ़ळ ६००० चौ.मी. इतकी जागा ग्रामपंचायत वाकसई यांना रस्ता बांधण्यासाठी प्रचलित दराने कायमस्वरूपी हस्तांतरीत करण्याकरीता महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३२८१६२६५४५३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashok Tanbaji Uike

Digitally signed by Ashok Tanbaji Uike
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=87cfab3c12a61b33987277f837a341fb6c84ebe6d1bf10339d150649af95e5b8, cn=Ashok Tanbaji Uike
Date: 2018.03.28 16:28:35 +05'30'

(अशोक उईके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री (पदुम), महाराष्ट्र राज्य
४. मा. मंत्री, महसूल व वन विभाग
५. मा. मंत्री, नगर विकास विभाग
६. अ. मु. स., महसूल व वन विभाग
७. अ.मु.स., नगर विकास विभाग
८. आयुक्त दुग्धव्यवसाय विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई
९. जिल्हाधिकारी, पालघर
१०. कृषी क्षेत्र अधिक्षक, पशुपैदास व संगोपन केंद्र, पालघर
११. निवड नस्ती, पदुम-१०.